**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०५.२०)**

**सोमवार दिनांक १२ मे २०२५**

**ठळक बातम्या**

1. **पाकिस्तानच्या नुकसानासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याची एअर मार्शल ए.के.भारती यांची स्पष्टोक्ती.**
2. **राज्य सरकार संरक्षण दलांसोबत अधिक समन्वयाने काम करणार: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.**
3. **गडचिरोली-छत्तीसगड सीमेवर चकमक; नक्षल्यांचे शिबिर उदध्वस्त.**
4. **बुद्धपौर्णिमा आज सर्वत्र साजरी, विविध ठिकाणी बुद्धवंदनेचं आयोजन.**
5. **क्रिकेटपटू विराट कोहलीची कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा.**

---

वार्ताहर परिषद सैन्य दल

पाकिस्तानी सैन्याने दहशतवाद्यांना साथ देण्याचा निर्णय घेतला, भारताला त्याचा प्रतिकार करणं गरजेचं होतं, त्यामुळे पाकिस्तानच्या नुकसानासाठी ते स्वतःच जबाबदार आहेत, अशी स्पष्टोक्ती एअर मार्शल ए के भारती यांनी केली आहे. तिन्ही संरक्षण दलाच्या वार्ताहर परिषदेत ते आज नवी दिल्ली इथं बोलत होते.

***(होल्ड बाईट - एअर मार्शल ए के भारती)***

***Our fight was with the terrorist. Neutralize the terrorist that we selected to be neutralized, and there after we only maintained the defence posture however we wear relentlessly bounded by days after days, night after night by his drones by his other unmanned aerial systems and that left us with no choice but to retaliate. Yet our retaliation was caliberated and it was graduated and it was proportionate.***

भारतीय हवाई दलानं पाकिस्तानचे अनेक अग्नीबाण आणि क्षेपणास्त्रं हाणून पाडले. पाकिस्तानचा हल्ला रोखण्यात भारताला यश आलं असं त्यांनी सांगितलं. भारताची सुरक्षा व्यवस्था अभेद्य होती, ती भेदणं पाकिस्तानला अशक्य होतं,

असं भारती म्हणाले. पाकिस्तानच्या हल्ल्यात भारताचं कमीत कमी नुकसान झालं, असं त्यांनी स्पष्ट केलं.

---------------------------------------------

उच्चस्तरीय बैठक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथे उच्चस्तरीय बैठक होत आहे. या बैठकीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ.एस.जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान, तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख आणि अनेक वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित आहेत.

---------------------------------------------

देवेंद्र फडणवीस

भारतीय सैन्यानं ज्या ताकदीनं आणि अचूकतेनं ऑपरेशन सिंदूर राबवलं ते अभूतपूर्व असून राज्य सरकार संरक्षण दलांसोबत अधिक समन्वयानं काम करेल, असं मुखमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. भारत आणि पाकिस्तान दरम्यानच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर संरक्षण दल आणि राज्य सरकार यांची संयुक्त बैठक आज वर्षा या निवासस्थानी झाली त्यावेळी  ते बोलत होते. राज्यातल्या सुरक्षेवर आणि सज्जतेवर झालेल्या या बैठकीत गुप्तचर माहितीचं आदानप्रदान झालं. तंत्रज्ञानाचा अधिक वापर आणि यापुढे घेण्याच्या खबरदारीबद्दल, तसंच संरक्षण दलांना राज्य सरकारतर्फे अपेक्षित सहकार्य आणि अधिक गतिमान समन्वय यंत्रणा उभारण्यावर बैठकीत चर्चा झाली. मुंबईची सुरक्षा तसंच सायबर सुरक्षेबाबत घेण्याच्या खबरदारीबद्दल बैठकीत विशेष चर्चा झाली. या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बालसिंग चहल, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, तसंच लष्करी अधिकारी उपस्थित होते.

---------------------------------------------

नक्षल्यांचे शिबिर उदध्वस्त

गडचिरोली जिल्ह्यातल्या भामरागड तालुका आणि छत्तीसगड राज्याच्या सीमावर्ती भागात आज पोलिस आणि नक्षल्यांमध्ये चकमक झाली. पोलिसांनी नक्षल्यांचे शिबिर उदध्वस्त करत त्यांच्याकडील बंदुका आणि अन्य साहित्य

ताब्यात घेतलं आहे. या चकमकीत काही नक्षली जखमी किंवा ठार झाल्याचा अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे. कवंडे पोलिस ठाण्याच्या हद्दीत भामरागड दलमच्या नक्षल्याचे शिबिर असल्याची माहिती काल दुपारी पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर सी-६० पथकाच्या दोनशे जवानांनी शोध मोहीम राबविली. आज सकाळी पोलिसांवर नक्षल्यांनी गोळीबार केला, त्यानंतर पोलिसांनीही नक्षल्यांना जोरदार प्रत्युत्तर देत कारवाई केली.

---------------------------------------------

गोंदिया वाहतूक

गोंदिया जिल्हयात वाहतूक नियमांचे उल्लघंन आणि हेल्मेटचा वापर करण्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने अपघातातील मृत्यूचे प्रमाण वाढत असल्याचे चित्र आहे. वाहतूक नियमांचे पालन आणि हेल्मेटचा वापर केल्यास वाढत्या अपघातांना प्रतिबंध लावणे शक्य होणार आहे. या बद्दल वाहतूक पोलीस निरीक्षक नागेश भास्कर यांनी आकडेवारीसह आवाहन केले आहे...

***(होल्ड बाइट - पोलीस निरीक्षक नागेश भास्कर)***

***मागील चार महिन्यांमध्ये एकूण 124 अपघात झालेली आहे. त्यामध्ये 64 जण मृत्युमुखी पडले आहे. सदर अपघात रोखण्यासाठी मी नागरिकांना आवाहन करतो त्यांनी हेल्मेट वगैरे कंपल्सरी पाळावे. वाहतुकीचे नियम पाळावे. अपघात रोखण्यासाठी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर सक्त कारवाई आपण करत आहोत. या महिन्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत अपघाताची संख्या कमी झाली आहे.***

---------------------------------------------

बुद्धपौर्णिमा

देशभरात आज बुद्धपौर्णिमा साजरी केली जात आहे. बिहारमध्ये बुद्धगया इथं थायलंड, व्हिएतनाम आणि म्यानमार या देशांमधून लाखो भाविक बुद्धजयंतीनिमित्त दाखल झाले आहे. यानिमित्तानं महाबोधी मंदिरात विशेष प्रार्थनेचं आयोजन करण्यात आलं होतं. नागपूर जिल्हयात कामठी इथल्या ड्रॅगन पॅलेस टेम्पल इथंही आज विशेष बुद्ध वंदना आयोजित करण्यात आली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती व बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर बुद्धिस्ट सेमिनरी उंटखाना यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय बुद्ध महोत्सव 11 ते 13 मे दरम्यान दीक्षाभूमीवर होत आहे. आज सायंकाळी 6 वाजता श्रामणेर दीक्षा दिली जाईल, अशी माहिती स्मारक समितीचे अध्यक्ष तथा धम्मसेनानायक भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांनी दिली. विदर्भात

विविध ठिकाणी अभिवादन कार्यक्रमांनी बुद्ध जयंती साजरी करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुद्धपौर्णिमेनिमित्त देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. सत्य, समानता आणि सौहार्द या तत्वांवर आधारित भगवान बुद्धांची शिकवण मानवतेसाठी मार्गदर्शक असल्याचं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. आज बुद्ध जयंती निमित्त नागपूर नागपूर नजीक पेंच आणि यवतमाळ जिल्ह्यातील टिपेश्वर आणि पैनगंगा अभयारण्य मध्ये प्राणी गणना संपन्न होत आहे.

-------------------------------------------

विराट कोहली

भारतीय क्रिकेटपटू विराट कोहलीने आज कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. त्याने समाज माध्यमावर ही माहिती दिली आहे. विराटने आत्तापर्यंत १२३ सामन्यांमध्ये ४६ पूर्णांक ८५ शतांशच्या सरासरीने ९ हजार २३० धावा केल्या आहेत. त्याच्या १४ वर्षांच्या कारकिर्दीत सचिन तेंडुलकर, राहुल द्रविड आणि सुनील गावस्कर यांच्यानंतर विराट हा भारतासाठी सर्वाधिक धावा करणारा चौथा फलंदाज बनला. ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू ग्रेग चप्पल याच्यानंतर कसोटी कर्णधारपदाच्या पदार्पणात दुहेरी शतकं करणारा विराट कोहली दुसरा क्रिकेटपटू आहे. कोहलीच्या नेतृत्वाखाली २०१९ मध्ये भारतीय संघानं ऑस्ट्रेलियामध्ये पहिल्यांदा बॉर्डर-गावस्कर करंडक कसोटी मालिका जिंकली. भारतानं २०२४ चा टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर कोहलीनं आधीच आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या टी-२० प्रकारातून निवृत्ती घेतली होती.

-------------------------------------------

हवामान

पूर्व विदर्भातील नागपूर वर्धा आणि चंद्रपूर या जिल्ह्यांसह पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम या सर्व जिल्ह्यांमध्ये आज वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. आज काही ठिकाणी मेघगर्जनेसह वादळी वारा आणि तुरळक  ठिकाणी अत्यंत हलक्या स्वरूपाची पर्जन्यवृष्टी होऊ शकते असं हवामान विभागातर्फे कळविण्यात आले आहे. पश्चिम विदर्भाच्या अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम या ठिकाणी उद्या देखील असंच पर्जन्यमान राहणार आहे, असं नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने कळवलं आहे. आगामी काही तासात विदर्भातील बुलढाणा, अकोला,

वाशीम, चंद्रपूर, यवतमाळ जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचा वारा तसेच  हलक्या पावसा ची शक्यता आहे.

---------------------------------------------

आमदार मोहन जोशी

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी स्थापन केलेल्या हरिजन सेवक संघ,  महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी माजी आमदार मोहन जोशी यांची पाच वर्षांकरिता नियुक्ती करण्यात आली आहे. संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.शंकर कुमार संन्याल यांनी  जोशी यांना नियुक्तीचे पत्र नुकतेच दिले. हरिजन सेवक संघाच्या वतीने आदिवासी भागात वसतीगृहे आणि शाळा चालविल्या जातात.

---------------------------------------------

गुणवंत अधिकारी

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाअंतर्गत २०२३-२४ यावर्षीचे गुणवंत अधिकारी आणि कर्मचारी पुरस्कार जाहीर करण्यात आले असून यामध्ये अकोला जिल्हा परिषदेचे सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे यांना गुणवंत अधिकारी पुरस्कार जाहीर झाला आहे.

---------------------------------------------

नवीन वेळापत्रक

देशाच्या सीमाभागात सुरू असलेल्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंन्टट्स ऑफ इंडिया या संस्थेनं आपल्या पुढं ढकललेल्या परीक्षांचं नवीन वेळापत्रक जाहीर केलं आहे. सीए फायनल, इंटरमिडिएट, पोस्ट क्वालिफिकेशन कोर्स आणि सेल्फ पेस्ड ऑनलाईन मोड्युल या परीक्षा आता १६ मेपासून सुरू होणार आहेत. सुधारित वेळापत्रकाचा तपशील इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंन्टट्स ऑफ इंडियाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

---------------------------------------------

वाघ हल्ला

चंद्रपूर जिल्ह्यात तेंदूपत्ता संकलनास सुरुवात झाली आहे. अशातच आज मुल तालुक्यातील भादुर्णी येथील महिला तेंदुपत्ता तोडण्यासाठी गेली असता जंगलात झुडुपांमध्ये असलेल्या वाघाने महिलेवर हल्ला करुन तिला जागीच ठार केले. तेंदुपत्ता संकलन करण्यासाठी जाणाऱ्या महिलांवर वाघ हल्ला होणाऱ्या घटना

वाढतच आहे. वारंवार मानवावर होणाऱ्या वाघाचे हल्ल्याने, वन विभागाने त्वरित उपाययोजना कराव्या अशी मागणी आता गावकऱ्यांकडून होत आहे.

---------------------------------------------